**DSCIF Syllabus for T.Y. B.A. CBCS Pattern POL 351**
**Political Science Semester V (5)**

**w.e.f. June 2020**

# Sub : Indian Political Thought

Total Marks – 100
Internal – 40
External – 60

## Arts, Commerce, Science College Bodwad

# Question Bank

खालील पैकी योग्य पर्याय निवडा. अधोरेखीत पर्याय प्रश्नांचे उत्तर आहे.

१) कौटिल्याचे मुळ नाव कोणते?

(अ) **विष्णुगुप्त** (ब) चंद्रगुप्त

(क) आर्य (ड) यापैकी नाही

२) आर्य चाणक्य हे चंद्रगुप्त मौर्याचे कोण होते?

(अ) मंत्री (ब) सरसेनापती

(क) **पंतप्रधान** (ड) सुभेदार

३) कौटिल्य हे कोणत्या विद्यालयाचे अध्यापक होते?

(अ) नालंदा (ब) **तक्षशिला**

(क) काशी विश्वविद्यालय (ड) यापैकी नाही

४) कौटिल्यांनी कोणत्या विश्वविद्यालयात उच्च शिक्षण घेतले?

(अ) काशी विश्वविद्यालय (ब) **नालंदा**

(क) तक्षशिला (ड) यापैकी नाही

५) कोणत्या वंशाचा नाश करून त्यांनी चंद्रगुप्त मौर्यांना सत्तारुढ केले?

(अ) मौर्य (ब) चंद्रगुप्त

(क) **<u>नंदवंश</u>** (ड) यापैकी नाही

६) कौटिल्यांना आचार्य चणक यांचे सुपूत्र असल्यामुळे कोणत्या नावाने ओळखले जाते?

(अ) विष्णुगुप्त (ब) कौटिल्य

(क) **<u>चाणक्य</u>** (ड) यापैकी नाही

७) नंदवंशाद्वारे अपमानित झाल्यामुळे चाणक्यांनी कोणती प्रतिज्ञा घेतली?

(अ) फेटा न बांधण्याची (ब) उपवास करण्याची

(क) **<u>शेंडीला गाठ न मारण्याची</u>** (ड) यापैकी नाही

८) कौटिल्याचा स्वभाव कशा प्रकारचा होता?

(अ) मनमिळावू (ब) शांत

(क) **<u>शिघ्रकोपी</u>** (ड) यापैकी नाही

९) कौटिल्य जसे कुशल अध्यापक होते तसेच ते कुशल कोण होते?

(अ) **<u>संघटक</u>** (ब) नेता

(क) राजा (ड) यापैकी नाही

१०) चाणक्याने कोणत्या साम्राज्याला शक्तीशाली बनविले?

(अ) आर्य (ब) **<u>मौर्य</u>**

(क) नंदघराणे (ड) यापैकी नाही

११) नंदवंशाचा अंत करुन चंद्रगुप्त मौर्याला कोणत्या सिंहासनावर आरूढ केले?

(अ) **<u>मगध</u>** (ब) नालंदा

(क) तक्षशिला (क) यापैकी नाही

१२) चाणक्याचा कोणता ग्रंथ प्रसिध्द आहे?

(अ) राज्यशास्त्र (ब) **<u>अर्थशास्त्र</u>**

(क) नितीशास्त्र (ड) यापैकी नाही

१३) चाणक्यांचा अर्थशास्त्र हा ग्रंथ कोणत्या शास्त्राचा प्रमुख ग्रंथ मानण्यात येतो?

(अ) अर्थशास्त्र (ब) **राजनितिशास्त्र**

(क) समाजशास्त्र (ड) यापैकी नाही

१४) (१) आन्विक्षिकी (२) त्रयी (३) वार्ता (४) दण्डनीती या विद्येचे चार प्रकार कोणत्या ग्रंथांत मांडले?

(अ) समाजशास्त्र (ब) राज्यशास्त्र

(क) **अर्थशास्त्र** (ड) यापैकी नाही

१५) मानवाच्या परस्पारिक व्यवहारासंबंधीच्या उपयांना कौटिल्याने काय म्हटले आहे?

(अ) राजनिती शास्त्र (ब) **अर्थशास्त्र**

(क) समाजशास्त्र (ड) यापैकी नाही

१६) वेदांचे ज्ञान देणारी विद्येस कौटिल्याने काय म्हटले आहे?

(अ) वार्ता (ब) **त्रयी**

(क) दण्डनीती (ड) यापैकी नाही

१७) कौटिल्याने विज्ञानशास्त्राला काय संबोधले आहे?

(अ) **आन्विक्षकी** (ब) त्रयी

(क) तत्त्वज्ञान (ड) यापैकी नाही

१८) बुध्दिमान राजाने दंडनीती योग्य प्रकारे उपयोगात आणली तरच कोणाकडून सहकार्य प्राप्त होईल?

(अ) राज्य (ब) **प्रजा**

(क) मंत्री (ड) यापैकी नाही

१९) सृष्टीच्या प्रारंभिक अवस्थेमधील अनेक वर्ष कोण अस्तित्वातच नव्हता?

(अ) **राज्याधिपती** (ब) राज्य

(क) मंत्रीगण (ड) यापैकी नाही

२०) राज्यपतीला राज्य चालविण्यासाठी शेती उत्पन्नाचा किती भाग धान्याच्या रुपाने द्यावा लागत होता?

(अ) १/३ (ब) १/४

(क) १/५ (ड) **<u>१/६</u>**

२१) कौटिल्य राज्याच्या कोणत्या सिध्दांताचा पुरस्कार करीत नाही?

(अ) **<u>दैवी सिध्दांत</u>** (ब) परस्परकशर

(क) संबंध (ड) यापैकी नाही

२२) कशासाठी राज्य ही अनिवार्य संस्था आहे?

(अ) **<u>जनतेच्या सुरख शांती करिता</u>** (ब) प्रजेच्या सुरक्षेकरीता

(क) धन एकत्र करणे करीता (ड) यापैकी नाही

२३) योग्य राज्य शक्ती ही प्रजेला कोणत्या पुरुषार्थाकडे घेऊन जाते?

(अ) धर्म (ब) अर्थ

(क) काम (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

२४) कोणत्या राज्य व्यवस्थेत दुर्बलाना देखील सुरक्षितता प्राप्त होते?

(अ) महान राज्य व्यवस्थेत (ब) **<u>शक्तिशाली राज्यव्यवस्थेत</u>**

(क) सर्वंकष राज्यव्यवस्थेत (ड) यापैकी नाही

२५) राज्यविहीन समाज कसा असतो?

(अ) **<u>अराजकता पूर्ण</u>** (ब) शांतता पूर्ण

(क) समाजवादी (ड) यापैकी नाही

२६) राज्य होण्यासाठी कोणत्या चार घटकांची आवश्यकता असते?

(अ) जनता (ब) सर्वश्रेष्ठ शासक

(क) भू-प्रदेश, सार्वभौमत्व (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

२७) कौटिल्याच्या मते राज्याची अंगे कोणती?

(अ) स्वामी (राजा) (ब) अमात्य (मंत्री)

(क) जनपद (भूमी आणि प्रजा) (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

२८) राजा कोणत्या गुणांनी युक्त असावा?

(अ) कोणत्याची अडचणीत विचलित न होणारा

(ब) योग्य व्यक्तींना प्रशासनात स्थान देणारा

(क) त्वरीत निर्णय समता धारण करणारा

(ड) **यापैकी सर्व**

२९) अमात्य संज्ञत कोणता वर्ग मोडतो?

(अ) **संपूर्ण अधिकारी वर्ग** (ब) केवळ मंत्री

(क) प्रधान (ड) सहाय्यक मंत्री

३०) राज्याच्या जबाबदाऱ्या कोणत्या असतात?

(अ) ग्रामीण जनतेचा विकास (ब) जनतेचे सुख

(क) जनतेचे संरक्षण (ड) **यापैकी सर्व**

३१) कोणाशिवाय राज्याच्या खजिन्याचे संरक्षण करता येणार नाही?

(अ) दुर्ग हे कडेकोट असावेत (ब) सैन्यशक्ती प्रबळ असावी

(क) युध्दनिती उत्कृष्ट असावी (ड) **यापैकी सर्व**

३२) उत्तम सैन्याचे गुण कोणते?

(अ) शिस्त-प्रशिक्षण (ब) आज्ञापालन

(क) स्वामीनिष्ठा सेवाभाव (ड) **यापैकी सर्व**

३३) कौटिल्याच्या मते कायद्याचे मूलस्त्रोत कोणते?

(अ) विवेकपूर्ण नियम (ब) व्यवहार शिष्टाचार

(क) धर्मशास्त्रे (ड) **यापैकी सर्व**

३४) कौटिल्याच्या मते दोन राजामध्ये काही अटींच्या आधारावर परस्परांचे संबंध जुळतात त्यांना काय म्हटले जाते.

(अ) **संधी (तह)** (ब) यान

(क) आसन (ड) निग्रह

३५) संधी, विग्रह, यान, आसन, संक्षख, द्वैधिभान या सहा गुणांना समजून घेण्यासाठी कौटिल्याने कोणता सिध्दांत मांडला?

(अ) **षाड्गुण्य सिध्दांत** (ब) राज्यसिध्दांत

(क) गुण्यसिध्दांत (ड) यापैकी नाही

३६) कौटिल्याने युध्दाचे कोणते प्रकार सांगितले

(अ) प्रकाश युध्द (पूर्व सूचना देवून) (ब) कटयुध्द (डावपेज आखून)

(क) तुष्णीयुध्द (शत्रूला उपद्रव देवून) (ड) **यापैकी सर्व**

३७) मुलींची विक्री करण्याची घृणास्पद प्रथा, जातिभेदाचा पाडाव करण्यासाठी १८१५ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी कोणती सभा स्थापन केली?

(अ) लोकसभा (ब) **आत्मीम सभा**

(क) जनसभा (ड) यापैकी नाही

३८) १८१८ साली कोणत्या चालीविरुध्द पहिला प्रबंध लिहीला?

(अ) **सतीच्या** (ब) साक्षरता

(क) अंधश्रध्दा (ड) मुंडनप्रथा

३९) राजा राममोहन रॉय यांनी १८२१ मध्ये कोणती असोसिएशन स्थापन केली?

(अ) **कलकत्ता युनिटेरियन** (ब) हुगली युनिटेरियन

(क) राधानगर युनिटेरियन (ड) यापैकी नाही

४०) दि प्रिसेप्टस ऑफ जीसस : दि गार्डड टु पीस अॅड हॅपिनेस हा लेख कोणत्या साली लिहीला?

(अ) **१८२०** (ब) १८२१

(क) १८२२ (ड) १८२३

४१) राजा रामकोहन रॉय यांचे इंग्लंडला जाण्याचे उद्देश कोणते होते?

(अ) दिल्ली बादशाहाचे निवेदन इंग्लंडच्या सम्राटाला सादर करणे.

(ब) हाऊस ऑफ कॉमन्स समोर सती प्रथा बंदीबद्दलची विनंतीपत्रके मांडणे

(क) ईस्ट इंडिया कंपनीच्या नूतनीकरणासंबंधीच्या चर्चेस उपस्थित राहाणे.

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

४२) दिल्लीच्या बादशाने कोणता किताब देवून त्यांना इंग्लंडला पाठविले?

(अ) **<u>राजा</u>** (ब) बादशाह

(क) राजबाहादूर (ड) दिवानबाहादूर

४३) राजा राममोहन रॉय यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ कोणत्या कार्यापासून केला?

(अ) धर्माला चिकटलेली बांडगुळे छाटण्यापासून (ब) हिंदूंच्या भ्रष्ट चालीरीती

(क) भ्रमाधिष्टित पाशवी रुढी व भारतीय मनाची झालेली कूपमंडूक वृत्ती

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

४४) ग्रंथप्रमाण्याच्या युगा विरुध्द बंड करण्याचा मान आधुनिक काळात कोणाला द्यावा लागेल?

(अ) नौरोजी (ब) टिळक

(क) **<u>राजा राममोहन रॉय</u>** (ड) न्यायमूर्ती रानडे

४५) हिंदूंनी आज अंगीकारलेली धर्मव्यवस्था ही त्यांच्या राजकीय हिताच्या दृष्टीने मूळीच अनुकूल नाही. याचा मला विलक्षण खेद होतो, असे राजा राममोहनरॉय यांनी कोणत्या साली म्हटले?

(अ) **<u>१८२८</u>** (ब) १८२९

(क) १८३० (ड) १८३१

४६) राजा राममोहन रॉय कोणत्या ग्रंथांना ईश्वरनिर्मिती व प्रमादरहित मानीत नाही?

(अ) **<u>वेदांना</u>** (ब) यर्जूवेद

(क) सामवेद (ड) अथर्ववेद

४७) राजा राममोहन रॉय यांना कशा प्रकारचे स्वातंत्र्य हवे होते?

(अ) शरीराचे (ब) मनाचे

(क) कृतीचे व विचारांचे (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

४८) आयर्लंवर ब्रिटनचे साम्राज्य चालु ठेवले जाऊ नये असा लेख राजा राममोहन रॉय यांनी आपल्या कोणत्या नियतकालिकांतून लिहीला?

(अ) **<u>मीरत-उल अख्बार</u>** (ब) संवाद कौमुदी

(क) मुताजिल (ड) यापैकी नाही

४९) राजा राममोहन रॉय यांनी कोणत्या कायद्याला मन:पूर्वक पाठिंबा दिला?

(अ) **<u>१८३२ चा सुधारणा कायदा</u>** (ब) मोर्लेमेंट सुधारणा कायदा

(क) प्रशासन सुधारणा कायदा (ड) यापैकी नाही

५०) राजा राममोहन रॉय यांनी फासी भाषेत कोणते साप्ताहिक संपादित केले?

(अ) सवांद-कौमुदी (ब) **<u>मीरत-उल अख्बार</u>**

(क) मुताजिल (ड) यापैकी नाही

५१) राजा राममोहन रॉय यांनी १८२१-२२ मध्ये बंगाली भाषेत कोणते साप्ताहिक संपादित केले?

(अ) मीरत-उल अख्बार (ब) **<u>संवाद-कौमुदी</u>**

(क) मुताजिल (ड) यापैकी नाही

५२) इंग्लंडच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने १७ जानेवारी १८२३ रोजी इंग्लंडच्या संसदेला भारताच्या वृत्तपत्र व्यवसायावरील काय हटविण्याची विनंती केली?

(अ) **<u>निर्बंध हटविण्याची</u>** (ब) अभिवृत्ती स्वातंत्र्य बंदी

(क) संपादक बंदी (ड) विचार स्वातंत्र्य निर्बंध

५३) वर्तमानपत्रांच्या संपादकांना वा मालकांना शासनाकडून परवाने घ्यावे लागतील असा वटहुकूम १४ मार्च १८३३ रोजी कोणी काढला?

(अ) लॉर्ड कर्झन (ब) **<u>जॉन अॅडम्स</u>**

(क) मेकॉले (ड) यापैकी नाही

५४) कोणते साधन हे इंग्लंड आणि भारताला जोडणाऱ्या अधीसत्तेची संपर्क साधन होऊ शकते?

(अ) **<u>स्वतंत्र मुक्त वृत्तपत्रे</u>** (ब) नियतकालीक

(क) साप्ताहीक (ड) पाक्षीक

५५) राजा राममोहन रॉय यांच्या मते नियतकालींचा हेतू काय आहे?

(अ) दान घडीची करमणूक (ब) बहुश्रुपणा वाढविणे

(क) शंकानिसन व जिज्ञासापूर्ती (ड) यापैकी सर्व

५६) स्वतंत्र वृत्तपत्राचे कोणते फायदे राजा राममोहन यांनी सांगितले आहे?

(अ) लोकांची मते समजण्यासाठी (ब) अपेक्षा व भावना अभिव्यक्त होतात

(क) कायदा लोकानुवर्ती करण्यासाठी व लोकांच्या अडचणी मांडल्या जाऊन त्यांचे निराकरण होऊ शकते.

(ड) यापैकी सर्व

५७) इंग्लंडच्या संसदेने पारित केलेल्या कोणत्या कायद्यात ख्रिस्ती माणसाच्या विरुध्दच्या खटल्यात हिंदू व मुसलमान व्यक्ती ज्यूरी म्हणून बसणार नाही.

(अ) **५ मे १८२६ ज्युरी कायदा** (ब) ५ मे १८२७ ज्यूरी कायदा

(क) ५ मे १८२८ ज्युरी कायदा (ड) ५ मे १८२९

५८) कोणताही कायदा पास करण्यापूर्वी राजा राममोहन रॉय यांनी कोणत्या सूचना दिल्या आहेत?

(अ) बौध्दिक व आर्थिकद्दष्ट्या वरिष्ठ असलेल्यांची मते शासनाने मागवावीत.

(ब) भारतीय अमंलदारांची मते मागवावी.

(क) सभागृहाच्या प्रवर समित्यांकरवी प्रतिक्रियांचा व शिफारशींचा विचार केला जावा.

(ड) **यापैकी सर्व**

५९) राजा राममोहन रॉय यांच्या मते कायदा कसा असतो?

(अ) भावना विरहीत विवेकाची निर्मिती (ब) सार्वभौम सत्तेची आज्ञा

(क) प्रवार समित्यांच्या शिफारसी (ड) **यापैकी सर्व**

६०) राजा राममोहन रॉय यांनी कायद्याच्या संहीती करणाचे कोणते फायदे सांगितले आहे?

(अ) कायदा व्यक्ती सापेक्ष राहाणार नाही

(ब) हिंदू की मुस्लिम पाहून न्याय होणार नाही

(क) शरीयत आणि श्रुतिस्मृति पुराणातील संदर्भ शोधावे लागणार नाही

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

६१) ज्या रुढी समाजविघातक आणि मानवतेला कलंक लावणाऱ्या असतात त्या कशा प्रकारे मोडून काढल्या पाहिजेत?

(अ) नीतीमत्तेने (ब) **<u>कायद्याने</u>**

(क) प्रयत्नपूर्वक (ड) यापैकी नाही

६२) न्यायालयीन कामकाज अधिक शुध्द करण्याच्या दृष्टीने रॉय यांनी कोणत्या मूलभूत सुधारणा सुचविल्या?

(अ) न्यायालीय कामकाजावर लोकमताची देखरेख

(ब) न्यायालयाचे कामकाज अवलोकन करण्यासाठी उपस्थित राहाण्याचा हक्क असावा.

(क) न्यायालयीन कामकाजाला मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दिली जावी.

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

६३) न्यायालयीन पंचायत पध्दतीबाबत रॉय यांनी कोणते सुझाव दिले आहेत?

(अ) जनसामान्यांच्या प्रतिनिधींना न्यायदान प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

(ब) भारतीय पंचाची यादी सदैव तयार ठेवावी.

(क) सेवानिवृत्त न्यायधीश, सेवानिवृत्त वकील इ. यादीत समावेश व्हावा.

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

६४) रॉय यांच्या मते कोणता शासन प्रकार संपूर्णपणे दोषरहित नाही?

(अ) प्रत्यक्ष लोकशाही (ब) अमर्याद राजेशाही

(क) महाजनशाही

(ड) यापैकी कोणताच प्रकार संपूर्णपणे दोषरहित नाही

६५) राजा राममोहन रॉय यांच्या मते कोणता शासन प्रकार सर्वोत्तम शासन प्रकार आहे?

(अ) प्रत्यक्ष लोकशाही (ब) अमर्याद राजेशाही

(क) महाजनशाही (ड) **<u>मर्यादित घटनात्मक राजेशाही</u>**

६६) रॉय यांनी महाजनशाहीचे कोणते दोष सांगितले?

(अ) मुठभर राज्यकर्ते आणि प्रजानन यांच्यात दरी पडते ती वाढत जाते.

(ब) जनस्थिती खालावते

(क) जनमाणसात असंतोष फोफावतो व राष्ट्रांचे विघटन होते

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

६७) हे जग न्नियन्त्या, असा एक धर्म तू निर्माण कर की जो माणसांमाणसातील भेद व परस्परांबद्दलची नावड नष्ट करून अखिल मानवमात्राच्या ऐक्यासाठी व शांततामय सहजीवनासाठी उपकारक ठरू शकेल अशी प्रार्थना कोणी केली?

(अ) दादाभाई नौरोजी (ब) **<u>राजा राममोहन रॉय</u>**

(क) कौटिल्य (ड) यापैकी नाही

६८) राजा राममोहन रॉय यांनी आंतरराष्ट्रीय दृष्ट्या कोणते स्वप्न १९व्या शतकापूर्वी मांडले?

(अ) सुसंस्कृत राष्ट्रांमधील राजकीय, व्यापारी समस्या सलोख्याच्या व न्याय मार्गाने सोडविणे.

(ब) परस्परांशी शांततेचे व मैत्रीचे संबंध टिकविणे.

(क) राष्ट्राराष्ट्रांना जोडणाऱ्या व शांततामय मार्गांनी संघर्षाची उकल शोधणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे स्वप्न

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

६९) लीग ऑफ नेशन्स किंवा संयुक्त राष्ट्रसंघाचे (यूनो) चे भाकीत कोणी केले?

(अ) न्यायमूर्ती रानडे (ब) दादाभाई नौरोजी

(क) **<u>राजा राममोहन रॉय</u>** (ड) यापैकी नाही

७०) रॉय यांनी राज्याच्या आवश्यकतेची कोणती मारणे सांगितले आहे?

(अ) लोकांचे जीवीत व वित्त सुरक्षित ठेवणे

(ब) शेजारी राष्ट्रांचे संबंध ठरवणे व टिकवणे

(क) आक्रमक राष्ट्रांच्या हत्यापासून जनतेचे संरक्षण करणे.

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

७१) १८५२ मध्ये दादाभाई नौरोजींनी कोणती संस्था स्थापन केली?

(अ) **<u>बॉम्बे असोसिएशन</u>** (ब) महाराष्ट्र असोसिएशन

(क) इंडिया असोसिएशन (ड) यापैकी नाही

७२) दादाभाई नौरोजींन कोणते साप्ताहिक सुरु केले?

(अ) **<u>रास्त गोफ्तार</u>** (ब) संवाद कौमुदी

(क) सत्य वृत्त (ड) यापैकी नाही

७३) दादाभाई नौरोजींनी डब्ल्यू. सी. बॅनर्जीच्या सहकार्याने कोणत्या सोसायटीची स्थापना केली?

(अ **<u>लंडन इंडिया</u>** (ब) फ्रान्स इंडिया

(क) बॉम्बे इंडिया (ड) यापैकी नाही

७४) दादाभाईंनी गणिताच्या प्रोफेसर पदावरुन कोणत्या पेशात पदर्पण केले?

(अ) **<u>व्यापारी</u>** (ब) उद्योगी

(क) लेखक (ड) समीक्षक

७५) लंडन इंडिया संस्थेने हिंदी तरुणांसाठी कोणते महत्त्वाचे कार्ये केले?

(अ) सनदी सेवा प्रवेश

(ब) सर्धात्मक परीक्षा इंग्लंडबरोबरच हिंदूस्थानातही घेण्याची आवश्यकता

(क) ब्रिटिश लोकमत व संसदेतील चर्चा यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न संस्थेने केला.

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

७६) १८७५ साली त्यांनी निवड कोठे झाली?

(अ) **<u>मुंबई कॉर्पोरेशन सभासद</u>** (ब) कोल्हापूर कॉर्पोरेशन

(क) सातारा कॉर्पोरेशन (ड) यापैकी नाही

७७) दादाभाई नौरोजींनी कोणता ग्रंथ लिहिला?

(अ) रास्तगोफ्तार (ब) **<u>पॉवर्टी अॅड अन् ब्रिटिश इंडिया</u>**

(क) राजनीतीशास्त्र (क) समाजशास्त्र

७८) १८८५ दादाभाईंनी कॉँग्रेसच्या पहिल्या बैठकीत कोणत्या विषयांवर ठराव मांडला?

(अ) हिंदूस्थानच्या राज्यपध्दतीची चौकशी करण्यासाठी एक बादशाही आयोग नियुक्त करण्यात यावा.

(ब) कायदे कौन्सिलाल वाढ व सुधारणा करावी

(क) आय.सी.एस. ची परीक्षा इंग्लंड व हिंदूस्थानात दोन्ही देशात एकाच वेळी व्हावी.

(ड) **यापैकी सर्व**

७९) १८९२ च्या निवडणूकीत दादाभाई नौरोजी कोणत्या मतदार संघातून निवडून आले?

(अ) हाऊस ऑफ कामन्स (ब) इंग्लंड

(क) **सेंट्रल फिन्सबरी** (ड) यापैकी नाही

८०) १८९३ च्या लाहोर कॉँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण झाले?

(अ) **दादाभाई नौरोजी** (ब) लोकमान्य टिळक

(क) पं. नेहरू (ड) यापैकी नाही

८१) दादाभाई नौरोजींनी हिंदुस्थानात असंतोष पसरण्याची कोणती कारणे दिली आहेत?

(अ) हिंदी लोकांचे न ऐकणारी बादशाही राज्यपध्दती

(ब) हिंदी लोकांच्या संपत्तीची शोषण व तज्जन्य भयंकर दारिद्र

(क) पार्लमेंटच्या व राणीच्या अभिवचनांची भारतातील इंग्लंडच्या अधिकाऱ्यांकडून झालेली निंद्य अवहेलना

(ड) यापैकी सर्व

८२) दादाभाईंनी १८९३च्या कॉँग्रेसच्या अध्यक्ष पदावरुन प्रथम कोणती मागणी केली?

(अ) **स्वराज्याची** (ब) समतेची

(क) सुराज्याची (ड) यापैकी नाही

८३) १९१५ साली अॅनी बेझंटन सुरु केलेल्या होमरुल लीगचे अध्यक्षपद कोणी स्वीकारले होते?

(अ) लोकमान्य टिळक (ब) **<u>दादाभाई नौरोजी</u>**

(क) अॅनी बेंझंट (ड) यापैकी नाही

८४) दादाभाईंच्या मते राष्ट्रसभा ही कोणत्या प्रश्नांचा विचार करणारी सभा असावी?

(अ) सामाजिक (ब) धार्मिक

(क) **<u>राजकीय</u>** (ड) यापैकी नाही

८५) दादाभाईंच्या मते हिंदूस्थानचे आर्थिक शोषण कोणत्या मार्गाने होत होते?

(अ) युरोपियन अधिकाऱ्यांनी बचतीच्या स्वरूपात स्वदेशी पाठविलेला पैसा

(ब) भारतामधील इंग्लंडचा प्रशासकीय खर्च

(क) दोन्ही देशातील सरकारी कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतने

(ड) **<u>यापैकी सर्व</u>**

८६) दादाभाईंच्या मते हिंदुस्थानात अनुभव व ज्ञानवंत वर्ग का निर्माण होऊ शकत नही?

(अ) भौतिक मालमत्ता जेव्हा देशाबाहेर जाते तेव्हा तिच्या बरोबर अनुभव आणि ज्ञान ही जाते.

(ब) संचित केलेला पैसा अनुभव व ज्ञान घेवून मायदेशी जाणारे अधिकारी हिंदूस्थानला भौतिक नैतीकदृष्ट्या दरिद्री बनवतात

(क) तरुणांना मार्गदर्शन करणारा जो एक अनुभवी ज्ञानवंत वर्ग निवृत्तीमुळे मायदेशी निघून गेला.

(ड) यापैकी सर्व

८७) दादाभाई नौरोजींनी इंग्रज राजवटीकडे किमान कोणत्या बाबींची पूर्तता हिंदूवासीयासाठी करावयास सांगितली?

(अ) वरिष्ठ नोकऱ्या (ब) मोफत व सक्तीचे शिक्षण

(क) पार्लमेंटमध्ये प्रवेश आणि सैन्य व आरमारावरील खर्च न लादणे

(ड) यापैकी सर्व

८८) इंग्रज व हिंदी नागरिकांमध्ये संवाद घडवून आणण्यासाठी दादाभाईंनी कोणते नियतकालिक सुरु केले?

(अ) **<u>इंडिया</u>** (ब) रास्तगोफ्तार

(क) सत्यअर्थ (ड) यापैकी नाही

८९) दादाभाईंना कोणते राजकारण पसंत नव्हते?

(अ) **<u>भिक्षांदेही</u>** (ब) अर्जविनंत्या

(क) आपला आज्ञाधारक सेवा उपाधी (ड) यापैकी नाही

९०) दादाभाईंच्या मते हिंदी माणसाच्या गुणांची वाढ का खुंटत आहे?

(अ) गुणांना संधी न दिल्यामुळे (ब) हक्क प्राप्त नसल्यामुळे

(क) संसदेत प्रवेश नसल्यामुळे (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

९१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीसाठी ब्रिटनमधील कोणत्या वृत्तपत्रांनी पाठींबा दिला?

(अ) डेली न्यूज (ब) ट्रिब्यून

(क) मॅचेस्टर गार्डियन व स्टार (ड) **<u>यापैकी सर्व</u>**

९२) हिंदू आणि मुस्लिमांनी राजकीय चळविण्याच्या कामासाठी एकदिलाने वागले पाहिजे हिंदू व मुसलमान हे हिंदूस्थानचे दोन नेत्र आहे, एकाला दुखापत झाली की दुसऱ्याला इजा झालीच असे कोणी म्हटले?

(अ) महम्मद इकबाल (ब) अब्दुल कलाम

(क) **<u>सर सय्यद अहमद</u>** (ड) यापैकी नाही

९३) दादाभाई आणि कोणता विचारवंत लंडनच्या एकाच ग्रंथालयात जात असत?

(अ) प्लेटो (ब) ॲरिस्टॉटल

(क) **<u>कार्ल मार्क्स</u>** (ड) यापैकी नाही

९४) ब्रिटिशांकडून हिंदूस्थानची लूट झाली म्हणून भारतदेश दरिद्री झाला हे कोणी प्रतिपादीत केले?

(अ) राजा राममोहन रॉय (ब) न्या. रानडे

(क) **<u>दादाभाई नौरोजी</u>** (ड) यापैकी नाही

९५) दादाभाई नौरोजी आधुनिक भारताचे शिल्पकार का ठरतात?

(अ) इंग्लंडच्या शोषणाविरुध्द आकाश पातळ एक करणारे

(ब) शोषणाच्या नैतीक बाबींवर भर देणारे

(क) भारतीय राष्ट्रवादाची गंगा प्रवर्तित करणारे **(ड) यापैकी सर्व**

९६) दादाभाई नौरोजींना कलकत्ता अधिकवेशनाच्या अध्यक्ष पदावरुन कोणते आवाहन केले?

(अ) आपण अव्याहत चळवळ केली पाहिजे

(ब) आयर्लंड मधील जहाल पक्षाचे व रॅडिकल पक्षाचे पार्लमेंटमधील सभासद, हिंदूस्थानची बाजू घेत आहेत

(क) इंग्लंडमधील वृत्तपत्रे डेली न्युज, ट्रिब्यून, मॅचेस्टर गार्डियन, सटार, डेली हिंदूस्थानची बाजू घेत आहे

(ड) **यापैकी सर्व**

९७) दादाभाईंना कोणत्या प्रकारची चळवळ अभिप्रेत होती?

(अ) शांततमाय (ब) विवेकी

(क) संयमी आणि अहिंसक (ड) **यापैकी सर्व**

९८) इंग्लंडचा पूर्ण जीवनक्रम प्रत्येक दिवस, एक ................ असतो.

(अ) **चळवळ** (ब) उद्योग

(क) क्रांती (ड) यापैकी नाही

९९) लहान चळवळ हे एक सभ्य व शांततापूर्ण असे शस्त्र असून त्यामागे ................ असते.

(अ) **नैतिक बळ** (ब) सामर्थ

(क) मनोबल (ड) यापैकी नाही

१००) ब्रिटिशांना हिंदुस्थान आपल्या .................. ची गुंतवणूक म्हणून हवा आहे.

(अ) **भांडवलाची** (ब) साम्राज्याची गुंतवणूक

(क) प्रभूसत्ता (ड) यापैकी नाही